आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१६ ऑक्टोबर २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी यंत्रणा विकसित करणं सुरू असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- खासगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याच्या मागणीचा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याकडून पुनरुच्चार
- कोकण रेल्वेत साडे चारशे पदांच्या भरतीचा प्रस्ताव, कर्जमुक्त करण्यासाठीचा प्रस्तावही रेल्वे मंत्रालयाला सादर

**आणि**

- देशातल्या शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी जोरदार तेजी, सेन्सेक्स सुमारे ९०० अंकांनी वधारला

**<><><><><>**

भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि दहशतवादाच्या विरोधात सरकारने शून्य सहिष्णुता धोरण स्वीकारलं आहे, असा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला आहे. नवी दिल्लीत ते आज प्रत्यार्पण आव्हाने आणि रणनीती संबंधीच्या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. सर्व गुन्हेगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी एक मजबूत यंत्रणा विकसित केली जात असल्याचं ते म्हणाले. या परिषदेविषयी बोलताना शहा म्हणाले....

**होल्ड.. बाईट-अमित शहा**

सरकारने २०१८मध्ये फरार आरोपींची मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार देणारा फरार आर्थिक गुन्हेगार कायदा आणला होता. हा कायदा लागू झाल्यानंतर पुढच्या चार वर्षांत दोन अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा रक्कम वसूल करण्यात आली आहे. मनी लॉँड्रिंग कायदेही मजबूत करण्यात आले असून त्यामुळे २०१४ ते २०२३ या

दरम्यान १२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आल्याचं शहा यावेळी म्हणाले. केंद्रीय अन्वेषण संस्थेने दोन दिवसांची ही परिषद आयोजित केली आहे.

सीबीआयने आतापर्यंत ३५ फरार गुन्हेगारांना देशात परत आणलं असून सध्या भारतातल्या ३३८ प्रत्यार्पणाचे विनंती अर्ज विविध देशांकडे प्रलंबित आहेत, अशी माहिती सीबीआयचे संचालक प्रवीण सूद यांनी दिली. भारताच्या विनंतीवरून आजपर्यंत ९५७ इंटरपोल नोटिशी जारी करण्यात आल्याचंही सूद यावेळी म्हणाले.

या परिषदेत विविध केंद्रीय आणि राज्य पोलीस संस्थांचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्याच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी सहभागी होत आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आंध्रप्रदेशातील श्रीशैलम इथं श्री शिवाजी स्फुर्ती केंद्रम इथं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ध्यानस्थ मूर्तीला अभिवादन केलं. यावेळी प्रधानमंत्र्यांनी श्री शिवाजी स्फुर्ती केंद्रामधल्या शिवाजी महाराज यांच्या इतिहासाची ओळख करून देणाऱ्या शिल्प, प्रतिमा आणि मूर्तींची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्रबाबु नायडू, पवन कल्याण उपस्थित होते. त्याआधी मोदी यांनी भ्रमरंबा मल्लिकार्जून स्वामी वरला देवस्थानमला भेट दिली.

**<><><><><>**

खासगी क्षेत्रातही आरक्षण लागू करायला हवं असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केलं. ते आज नागपुरात वार्ताहर परिषदेत बोलत होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत

विचारलं असात महाविकास आघाडीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला घेऊन मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत फारसा फायदा होणार नाही असं आठवले म्हणाले. मुंबईत ४० टक्के मराठी मतदारांचा कौल हा महायुतीलाही मिळणार असून २० टक्के मतं राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना मिळू शकतील असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. येत्या ८ मार्च रोजी आरपीआयचं राष्ट्रीय अधिवेशन नागपुरात होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठात डॉ आंबेडकर अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी काल मुंबई विद्यापीठ आणि केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या डॉ आंबेडकर फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार झाला. या अध्यासन केंद्राच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्याय, समता, मानवी हक्क आणि आर्थिक सक्षमीकरणाशी निगडित विचारांचा प्रचार केला जाईल.

**<><><><><>**

कोकण रेल्वेत साडे चारशे पदांच्या भर्तीसाठी रेल्वे मंत्रालयाला अर्ज करण्यात आला असून येत्या एक ते दोन महिन्यात त्याबद्दल अनुमोदन मिळण्याची शक्यता असल्याचं कोकण रेल्वेचे अध्यक्ष संतोष कुमार झा यांनी सांगितलं आहे. ते काल कोकण रेल्वे कॉर्पोरेशनच्या पस्तिसाव्या स्थापना दिनानिमित्त वाशी इथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. स्थानिक पदभरती प्रक्रिया राबवली जात असून येत्या २७ ऑक्टोबर रोजी ७९ जागांसाठी परीक्षा होणार असल्याचंही ते यावेळी म्हणाले. कोकण रेल्वेला कर्जाची परतफेड करण्यासाठी ७ हजार ७७६ कोटी रुपयांचा प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाकडे पाठवला आहे. तो प्रस्ताव मंजूर झाला तर कोकण रेल्वे कर्जमुक्त होईल, असंही झा यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान जाहीर केलं आहे. एकूण 4 हजार 961 कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. महापालिका आस्थापनेवरचे अधिकारी, कर्मचारी, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षक यांना 34 हजार 500 रुपये, तर ठोक मानधनावर, किमान वेतनावरचे तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीवर वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असणारे अधिकारी,कर्मचारी, रोजंदारीवरचे आरोग्य सेवक, मानधनावरील बालवाडी शिक्षक आणि मदतनीस यांना 28 हजार 500 रुपये सानुग्रह अनुदान म्हणून दिलं जाणार आहे.

<><><><><>

अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून दर कपातीची अपेक्षा, जागतिक बाजारातलं सकारात्मक वातावरण यामुळं सलग दुसऱ्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी आहे. सकाळपासून असलेली तेजी दुपारपर्यंत आणखी वाढत गेली. बँका, माहिती तंत्रज्ञान कंपन्या, ग्राहकोपयोगी वस्तू निर्माण करणाऱ्या कंपन्यांचे समभाग आज तेजीत आहे. सध्या सेन्सेक्समध्ये ९०० हून अधिक अंकांनी वाढ झाली असून हा निर्देशांक ८३ हजार ५०० अंकांच्या पुढे व्यवहार करतो आहे. निफ्टी सुमारे ३०० अंकांनी वधारला असून त्यात २५ हजार ६०० अंकांच्या पलीकडे व्यवहार सुरू आहेत.

<><><><><>

दिल्ली आणि मुंबईच्या हवेतली कार्बन डायॉक्साईड आणि मिथेन या प्रदूषणकारी वायूंची पातळी गेले अनेक वर्षं वाढत असल्याचं आयआयटी मुंबईच्या संशोधकांच्या अहवालात दिसून आलं आहे.

दिल्लीच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक २११ पर्यंत अर्थात 'वाईट' या श्रेणीत पोचला असून येत्या शुक्रवारपर्यंत तो ३४६ पर्यंत म्हणजेच 'अतिशय वाईट' या श्रेणीत पोचण्याची शक्यता आहे. मुंबईच्या हवेचा सरासरी गुणवत्ता निर्देशांक पावसाळा थांबल्यानंतरच्या काळात अधिक खराब झाला असून तो गेल्या आठवड्यात १५३ पर्यंत पोचला असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय जनता पार्टीच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही राज्यभर 'पालावर दिवाळी' हा सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत भाजपचे मंत्री, आमदार, खासदार आणि पदाधिकारी  ऊसतोडणी कामगार, भटके-विमुक्त समुदाय,

बांधकाम मजूर आणि इतर वंचित घटकांच्या पालावर जाऊन दिवाळी साजरी करणार आहेत. वाड्या वस्त्यांवर जाऊन दिवाळी फराळ, मिठाई, नवीन कपडे, भेटवस्तू तसंच मुलांसाठी फटाके आणि शैक्षणिक साहित्याचं वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये आगामी कुंभमेळ्यासाठी नाशिक ते त्र्यंबकेश्वर रस्त्याचं रूंदीकरण करून कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गावरील दुकाने, हॉटेल्स आणि इतर बांधकामं हटवण्याची मोहिम नाशिक महानगर विकास प्राधीकरणानं काल सुरु केली. या विरोधात पिंपळगाव बहुला इथं रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. दरम्यान, नाशिक तालुक्यातील ३५ आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सुमारे दीडशे अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत , असे प्राधिकरणाने स्पष्ट केले.

**<><><><><>**

रत्नागिरीतल्या करबुडे गावात काल दुपारनंतर अचानक आलेल्या पावसामुळं वीज पडून दोन बैलांचा मृत्यू झाला. वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे काही घरं, गोठे यांसह वाचनालय, शाळा यांसारख्या सार्वजनिक मालमत्तांचंही नुकसान झालं. पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज त्या भागाला भेट देऊन परिसराची पाहणी केली.

**<><><><><>**

प्रसिद्ध लेखिका अर्चना शंभरकर यांचं काल दीर्घ आजाराने निधन झालं. त्या ५२ वर्षांच्या होत्या. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोकण विभागाच्या प्रभारी उपसंचालक म्हणून त्या कार्यरत होत्या. त्यांची सोलमेट ही कादंबरी तर

सारीनास हा लघुकथा संग्रह प्रसिद्ध झाला होता. शंभरकर यांच्या पार्थिवावर आज दुपारी खारघर इथल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

श्रोते हो, नक्षलवादी चळवळीतला मोठा नेता भूपती यानं काल गडचिरोली आत्मसमर्पण केलं. भूपतीचे आत्मसमर्पण, देशातल्या नक्षल चळवळीवर त्याचा होणारा परिणाम यासंदर्भात नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील यांची विशेष मुलाखत आज आपण संध्याकाळी सव्वा ७ वाजता वृत्त विशेष कार्यक्रमात ऐकू शकता.